# ऋणनिर्देश

प्रस्तुत लघु-प्रबंधाचे लेखन करताना मला अनेकांचे विविध प्रकारे सहकार्य लाभले. असे प्रेमळ व निरपेक्ष सहकार्य लाभणे ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे.

माझ्या मार्गदर्शक गुरू प्रा. डॉ.सौ.शुभांगी शशिकांत भुतकर यांचे माझ्यावर अपार ऋण आहेत. त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष चर्चा करून मार्गदर्शन मिळाले व ''संध्या देशपांडे यांच्या 'अश्वदा' कादंबरीचा अभ्यास'' हा विषय घेण्याचे निश्चित केले. चिकित्सक मार्गदर्शनाबरोबर अनेक संदर्भ उपलब्ध करून देण्यापर्यंत अनेक गोष्टीत त्यांनी मला सहकार्य केले आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच सदैव राहणे मला आवडेल.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील १) डॉ.कृष्णा किरवले, २) डॉ.विश्वनाथ शिंदे, ३) डॉ.रवींद्र ठाकूर यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांची मी विशेष आभारी आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे.जी.जाधव, प्राचार्य शशिकांत नारायण भुतकर, छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील प्राध्यापक वृंद या सर्वांचे मला मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

'अश्वदा' कादंबरी माझ्या वाचनात आली. ही कादंबरी माधवीच्या जीवनाची संघर्ष कथा आहे. माधवीच्या व्यक्तिमत्त्वाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करावे असे माझ्या मनात आले. म्हणून हा विषय मी लघु-प्रबंधासाठी निवडला.

माझे वडील श्री.मारूती विष्णू नाळे व आई सौ.लक्ष्मी हे शिक्षणाबद्दल जागृत आहेत. आपल्या मुलीने खूप शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा होती. त्यानुसार मी आज शिक्षण पूर्ण करून काही प्रमाणात संशोधनातही काम करून त्यांची इच्छा पूर्ण केल्याचे मला समाधान होत आहे.

माझे प्रेरणास्थान माझे पती श्री.संदिप आत्माराम जगताप यांना माझा खूप अभिमान आहे. माझ्या पत्नीने शिक्षण क्षेत्रात उज्ज्वल यश मिळवावे असे त्यांना नेहमी वाटते. त्यांच्या कामाचा व्याप सांभाळून माझ्या संशोधनाच्या कामी त्यांनी मला मोलाचे मार्गदर्शन

व सहकार्य केले. त्यामुळेच मी हे संशोधन पूर्ण करू शकले.

माझे स्फूर्तिस्थान असलेला माझा बंधू चि.अमोल मारूति नाळे व मैत्रीण मनोरमा शिवाजी सोनवणे यांनी मला संशोधन करण्याच्या कामी नेहमी प्रोत्साहित केले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी आहे. तद्वतच माझ्या सासूबाई श्रीमती शांता आत्माराम जगताप यांनी मला अभ्यासास वेळ देऊन मदत केली. त्यांच्याबद्दल मी आदर व्यक्त करते.

माझ्या संशोधनाच्या कामी माझे चुलते श्री.पोपट विष्णू नाळे व चुलती सौ.विमल, सासरे श्री.चंद्रकांत शंकर जगताप व सासूबाई सौ.रतन, आत्येबहीण कु.उज्ज्वला राऊत,दाजी श्री. अशोक राऊत, बहीण सौ. सुनिता, दाजी श्री.विठ्ठल व बहीण सौ.अनिता, बहीण सौ.शितल जाधव, दीर प्रदीप जगताप, डॉ.मानसिंग शिंदे, डॉ.योगिता पोळ, प्रा.लक्ष्मण बोराटे या सर्वांनी मला बहुमोल मदत केली. त्याबद्दल मी त्यांचेही आभार व्यक्त करते.

संध्या देशपांडे यांचे वास्तव्य बेळगावात आहे. मी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी 'अश्वदा' कादंबरीविषयी केलेली चर्चा उपयुक्त ठरली. त्या माझ्याबरोबर दिलखुलास बोलल्या. त्यांच्या स्वभावाची ओळख झाली. हसतमुख,निगर्वी बोलक्या स्वभावामुळे त्यांचे मला खूप सहकार्य मिळाले.

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारचे शिवाजी ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे बॅ.जयकर ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या ठिकाणाहून मिळालेले संदर्भग्रंथ या लघु-प्रबंधासाठी मोलाचे आहेत. या सर्व ग्रंथालयातील ग्रंथपाल, सेवकांची मला सतत मदत मिळाली. या सर्वांचे आभार मी मनापासून व्यक्त करते.

या लघु-प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे शितल एंटरप्रायजेसचे श्री. योगेश सुरेश भस्मे व इम्रान शेख यांचेही मी आभार मानते.

वरील सर्वांखेरीज ज्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे या कार्यास हातभार लागला परंतु नामनिर्देश करण्याचे राहिले असेल अशांचेही मी हार्दिक आभार मानत आहे.